**विशेष दिवाणी मुकदमा क्र.४५३/२०२३**
**निशाणी क्र. ६३**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की --

माझे नांव - रमेश सखाराम बरबडे
वय सुमारे - ४५ वर्षे, व्यवसाय - मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह,
नेमणुक – दैनिक लोकमत, सातारा.
---------------------

**<u>वादीतर्फे सरतपास ॲड. श्री. ए. आर. पिसाळ यांचेतर्फे सुरू</u> :**

१. मी ॲडव्हरटायजींग सेलला मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह म्हणुन काम करतो. मला दाव्याचे साक्षी समन्स मिळालेले आहे. मी साक्षी समन्समध्ये नमुद केल्याप्रमाणे दि.०५.०२.२०११, १५.०२.२०११ व १५.०६.२०१२ रोजीचे वृत्तपत्र सोबत आणलेले आहे. त्याच्या सत्यप्रती मी आजरोजी न्यायालयात दाखल केलेल्या आहेत. मला आता कागद यादी नि.क्रं.६२ लगत अ.क्रं.१ ते ३ वरील वृत्तपत्रातील नोटीस दाखविण्यात आली. त्यातील मजकुर मुळ वृत्तपत्रातील मजकुराप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावरील सही व शिक्का माझाच आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि.क्रं.६४ ते ६६</u>** देण्यात येते.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे ॲड. श्री. आय. डी. खान यांचेतर्फे</u>** *:*

२. हे म्हणणे खरे आहे की वकिलांची ओरिजनल सही शिक्क्याची नोटीस माझ्यासोबत नाही. हे म्हणणे खरे आहे की नोटीस ज्या वकिलांनी दिली त्यांना एक पावती दिली जाते ती देखील आजरोजी माझ्यासोबत नाही. नोटीस जाहीर केल्यानंतर त्याच्या दोन वृत्तपत्रातील प्रती संबंधीत वकिलांना वार्ताहरामार्फत पाठविली जाते. हे म्हणणे खरे आहे की सदर नोटीसीस हरकत घेतल्याबाबत देखील नोटीस आमच्याकडे आली होती. सदर हरकत नि.क्रं.६५ वर आहे. हे म्हणणे खरे आहे की तिसरी नोटीस ॲड. मोने यांच्यामार्फत हरकतीबाबत देण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की वकिलांमार्फत नोटीस आल्यानंतर ती वृत्तपत्रात जाहीर करणे एवढेच माझे काम आहे. मी आजरोजी दैनिक वर्तमानपत्राची संपुर्ण प्रत दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे

नाही की पठाण वकिलांनी नोटीससोबत कव्हर लेटर दिले नव्हते.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई
दिनांक : १२.१२.२०२५

(ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
वाई.